

# जनावरांमधील अंग बाहेर पडणे: कारणे आणि उपाययोजना





गाई व म्हशींमधील अंग बाहेर पडणे हा जनावर विण्यापूर्वी किंवा जनावर विल्यानंतर होणारा आजार आहे. अंग बाहेर पडण्याचे प्रमाण हे जनावर विण्यापूर्वी कमी, तर विल्यानंतर जास्त प्रमाणात आढळते. हे लक्षात घेऊन पशुवैद्यकाकडून जनावरांची वेळीच तपासणी करून त्याप्रमाणे औषधोपचार करावेत.

### जनावर विण्यापूर्वी अंग बाहेर येण्याची कारणे :

१) जनावराची विण्याची वेळ जवळ येऊन कळा सुरू होणे.
२) जनावरांच्या शरीरातील 'इस्ट्रोजन' नावाच्या ओजस रसाचे प्रमाण वाढणे.
३) जनावरांकडून जास्त प्रमाणात 'इस्ट्रोजन' हे ओजस रस असणाऱ्या वनस्पती खाल्ल्या जाणे.
४) जनावरांना पोटाचे आजार हणे. (उदा. हगवण) त्यामुळे जनावर जास्त प्रमाणात कळा देते.

### जनावर विण्यापूर्वी अंग बाहेर आले तर घ्यावयाची काळजी

१) अंगाला एखाद्या निर्जंतुक पाण्याच्या द्रावणाने व्यवस्थित, स्वच्छ धुऊन घ्यावे.
२) जर अंगावर शेण, चिखल, कचरा लागलेले असेल तर ते काळजीपूर्वक स्वच्छ करावे.
३) जर अंगाला एखादी जखम झाली असेल व जनावर जास्त प्रमाणात कळा देत असेल त्यासाठी पशुवैद्यकाच्या सल्ला घ्यावा.
४) गाभण जनावरात बाहेर आलेल्या अंगाच्या कमळ मुखातील चिकट स्त्राव काढू नये, अन्यथा गर्भपात होण्याचा धोका असतो.
५) पशुवैद्यकाच्या सहाय्याने बाहेर पडलेले अंग पूर्ववत बसवून घ्यावे.
६) जनावर जर जास्त व सतत कळा देत असेल व अंग पुन्हा बाहेर पडत असेल, तर त्यासाठी चुंबळ बांधणे हा सर्वांत उपयुक्त उपचार आहे.

### जनावर विल्यानंतर अंग बाहेर येण्याची कारणे :

१) आनुवंशिकता
२) 'प्रोजेस्टेरॉन' या ओजस रसाचे शरीरातील प्रमाण कमी होणे.
३) जनावरांच्या जननेंद्रियाला इजा असणे.
४) अडलेले वासरू काढताना जर जास्त प्रमाणात ओढण्यात आले तर वासरासोबत जनावराचे अंग बाहेर पडू शकते.
५) जनावर विल्यानंतर जनावराचा वार पूर्णतः न पडणे, यामुळे जनावर नेहमीपेक्षा जास्त कळा देते व ज्यामुळे अंग बाहेर पडू शकते.

प्रकाशन
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत

६) जनावराने जर जास्त प्रमाणात 'इस्ट्रोजन' नावाचा ओजर रस असणाऱ्या वनस्पती खाल्ल्या, तर गर्भाशयाच्या कळा सुरू होऊन अंग बाहेर येते.
७) जनावर विण्याच्या वेळी जास्त प्रमाणात कळा देणे.
८) जनावरांचा अपरिपूर्ण आहार.

**लक्षणे :**

१) बाहेर पडलेले अंग दोन्ही निरण्यांमधून एखाद्या टरबुजाच्या आकाराचे व लाल रंगाचे असून ते खाली गुडघ्यापर्यंत लोंबलेले असते.
२) जनावर सतत कळा देत राहते.
३) अंगाला एखादी जखम झाली असेल तर त्यातून रक्तस्त्राव होतो.
४) जनावर सतत बेचैन राहणे.
५) जनावर रवंथ करत नाही.
६) जनावरांच्या शरीराचे तापमान वाढते.
७) परिस्थिती जर जास्त गंभीर स्वरूपात असेल तर जनावर दगावण्याची शक्यता असते.

**काळजी :**

१) अंग बाहेर पडल्यावर ते बाहेरच्या वातावरणात येते. त्यामुळे त्यातील ओलसरपणा, लवचिकपणा जाऊन ते सुकते व सुजते (बाहेर पडल्यानंतर चार-सहा तासानंतर) तसेच अंगावर माश्या बसणे, जखम होणे, शेण किंवा चिखल लागणे या गोष्टी टाळण्यासाठी अंगाला ओल्या सुती कापडात गुंडाळावे किंवा प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवावे.
२) जनावरास एखाद्या स्वच्छ ठिकाणी ठेवावे.
३) बाहेर पडलेल्या अंगाचे कुत्र्यांपासून व कावळ्यांपासून संरक्षण करावे.

**उपचार :**

१) अंगाला जर शेण, माती किंवा राहिलेला वार चिकटलेला असेल तर तो काढून घ्यावा.
२) अंगाला एखाद्या निर्जंतुक पाण्याच्या द्रावणाने स्वच्छ धुऊन घ्यावे.
३) अंगाला बर्फाचे गोळे लावावेत. जेणेकरून त्यातील ओलसरपणा अबाधित राहून ते पूर्वीच्या आकारास येईल.
४) जर अंगाला जखम झाली असेल तर त्याला (अंगाला) स्थानिक भूल पशुवैद्यकाचा सल्ला घेऊन द्यावी.
५) बाहेर पडलेले अंग एखाद्या पशुवैद्यकाच्या साह्याने पूर्ववत बसवून घ्यावे.
६) जनावर जर सतत कळा देत असेल वय अंग पुन्हा बाहेर पडत असेल तर चुंबळ बांधणे हा खात्रीशीर इलाज आहे.
७) त्वरीत पशुवैद्यकाचा सल्ल्याने उपचार करावा.


www.mafsu.in

✲ मार्गदर्शक ✲

www.knpcvs.in

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ संकलन ✲

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.